सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४४ | शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. प्रवीण पाटील
माजी चेअरमन : खानदेश शिक्षण मंडळ व अर्बन बँक, अमळनेर



श्री. देवदत्त संदानशिव
वेंडर, अमळनेर.



डॉ. श्री. अनिल वाणी
अमळनेर



सौ. सुरेखा पाटील
शिक्षिका



श्री. अनिलदादा जोशी
वाडी संस्थान सेवेकरी, अमळनेर



श्री. अमोल शहा
अमळनेर





अमळनेर : चोपडा रस्त्यावरील शनीपेठ परिसरात डंपरने तरुणास चिरडल्यानंतर रास्तारोको करताना महिला व नागरिक. दुसऱ्या छायाचित्रात रास्तारोको आंदोलन करणाऱ्या नागरिकांची समजूत घालताना पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम.
(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# भरधाव डंपरने शनी पेठजवळ तरुणास चिरडले

## एक तरुण गंभीर जखमी, नागरिकांचा तासभर रास्तारोको

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : मातीने भरलेल्या डंपरने एका मोटारसायकलस्वार तरुणास चिरडले आहे. यात तो गंभीर जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास चोपडा- अमळनेर रस्त्यावरील शनिपेठजवळ घडली. जितेंद्र अरुण चव्हाण (वय ३०, रा. ताडेपुरा) असे तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर परिसरातील संतप्त नागरिकांसह महिलांनी सुमारे एक तास रास्ता रोको केला. पोलिसांनी समजूत घातल्यानंतर रास्ता रोको मागे घेण्यात आला.**

धुळे- चोपडा रस्त्यावर शुक्रवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास मातीने भरलेल्या डंपरने (एमएच४८एजी ८३०७) मोटारसायकलवरील (एमएच१८एटी५४७९) तरुण जितेंद्र अरुण चव्हाण यास चिरडले. या अपघातात त्याच्या पोटाला गंभीर दुखापत झाली आहे. त्याला एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

अपघातानंतर संतप्त नागरिकांनी घटनास्थळी सुमारे तासभर रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे बस, अवजड वाहने तसेच दुचाकी वाहनांच्या दोन्ही बाजूंनी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निरीक्षक निकम यांनी नागरिकांची समजूत काढत वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. दरम्यान, या घटनेने वाहतुकीचा खोळंबा झाल्याने श्री मंगळग्रह मंदिराजवळील रस्त्याने वाहतूक वळविण्यात आली होती.

### गतिरोधक बसविण्याची मागणी

परिसरातील रहिवाशांनी या ठिकाणी गतीरोधक बसविण्याची मागणी केली आहे. धुळे- चोपडा मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहने भरधाव ये- जा करतात. त्यामुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या रस्त्यावर मोठेमोठे खड्डे असल्याने तसेच रस्त्याची रुंदी कमी असल्याने वारंवार अपघात होत असल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे. बांधकाम विभागाने या परिसरात गतिरोधक बसवावे. तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी केला आहे.




अमळनेर : राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केलेली देशी- विदेशी मद्य व ताब्यात घेतलेले आरोपी.

# बनावट देशी- विदेशी मद्य निर्मिती कारखाना उद्‌ध्वस्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई, ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील आर. के. नगरमध्ये बनावट देशी- विदेशी मद्य निर्मिती करण्याचा कारखाना उध्वस्त करून करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी ही कारवाई केली आहे. या कारवाईत ३ लाख १ हजार ७३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक जी. एस. मोरे यांच्यासह पथकास मांडळ- जवखेडा रस्त्यावर एका विहिरीजवळ भावलाल सुखदेव पारवे (वय ३० रा. नवलनगर) हा अवैधरित्या देशी- विदेशी मद्य वाहतूक करताना आढळून आला. अधिक चौकशी केली असता अमळनेर येथील आर. के. नगरमधील दिनेश प्रभाकर खांबायत (वय ४६) हा देशी विदेशी दारू निर्मिती करतो, अशी माहिती मिळाली. त्यानंतर श्री. मोरे यांच्यासह निरीक्षक अ. कै. सु. मोमीन, विपूल राजपूत, दिनेश पाटील, भूषण परदेशी, सुषमा सुल्ताने यांनी रात्री ९च्या सुमारास आर. के. नगरमध्ये छापा टाकला.

पान २ वर

# अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावून अत्याचार!

## धरणगाव तालुक्यातील घटना; पीडिता चार महिन्यांची गरोदर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : धरणगाव तालुक्यातील एका गावातील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा जबरदस्तीने विवाह लावून देण्यात आला आहे. त्यानंतर तिच्यावर झालेल्या अत्याचारामुळे ती चार महिन्याची गरोदर राहिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याप्रकरणी धरणगाव पोलीस ठाण्यात पतीसह दोन्ही कुटुंबातील सदस्यांविरूद्ध पोक्सो आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

पीडित मुलगी ही अल्पवयीन असल्याची माहिती असूनही १५ ऑक्टोबर २०२५ रोजी एका गावात तिचा विवाह सदाशिव सपकाळे (वय ३२) याच्याशी लावून देण्यात आला. पीडितेचे आई- वडील आणि आरोपीचे आई- वडील यांचा यात मुख्य सहभाग होता. लग्नानंतर आरोपी सदाशिव याने पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवले. ज्यातून पीडिता सध्या चार महिन्यांची गरोदर आहे.



पीडितेच्या प्रसूतीपूर्व तपासणीत ती अल्पवयीन असल्याचे कायदेशीर समोर आले आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत ठाणे येथील महिला पोलीस उपनिरीक्षक प्रणाली शिंदे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. मुलीच्या लग्नाचे कायदेशीर वय (१८ वर्षे) पूर्ण नसतानाही हा विवाह लावून दिल्याने कायद्याचे उल्लंघन झाले आहे. या गुन्ह्यात पती सदाशिव सपकाळे याच्यासह दोन्ही बाजूंच्या पालकांचा समावेश आहे. या घटनेमुळे धरणगाव तालुक्यात संताप व्यक्त होत आहे. पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

Mundada Foundation's

**SHRI. N.T MUNDADA GLOBAL VIEW SCHOOL**

Behind Civil Court, Near Water Tank, Amalner 425401
Jalgaon Dt. Ph: 02587 – 222202
C.B.S.E. AFFILIATION NO. 1131481

**Wanted Teachers**

Looking for Energetic and passionate Educators with Fluency in the English Language.

| Section | Subject | Eligibility |
|---|---|---|
| | Co-Ordinator | M.A./M.Sc. B.Ed |
| Pre -Primary | | Any Graduation with T.T.C / Montessori training / B.Ed. |
| Primary | English, Social Studies | M.A, B.Ed. |
| | Mathematics, Science | B.Sc./M.Sc., B.Ed |
| Secondary | English, Social Studies Sanskrit, | M.A, B.Ed. |
| | Mathematics, Science | B.Sc./M. Sc., B.Ed |
| Non-Teaching | Aunty Watchman | S.S.C |

Your application will be much appreciated fulfilling the following criteria.

- Passport size photographs
- Complete Resume
- Minimum 2 years of experience
- English Fluency is Must
- Experience Certificate mentioning last drawn salary
- Salary will not be a constraint for the deserving candidates
- CBSE Experience is compulsory

* Handwritten Application
* Original Certificate
* Computer Knowledge

Date of Interview: 15/02/2026
Time 9.15am onwards

Venue: Shri. N.T.Mundada Global View School

Mr. Lakshman L
Principal

Mrs. Chhaya O. Mundada
Chairperson

**Admission Open 2026-27 Play Group & Nursery**

## संपादकीय

### प्रशासन, राजकारण आणि नागरिक : जबाबदारीची त्रिसूत्री

लोकशाही व्यवस्थेत सामान्य नागरिक हा केंद्रबिंदू असतो, हे तत्त्व सर्वमान्य आहे. नागरिकांना मूलभूत व नागरी सुविधा पुरवणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे, तर त्या प्रशासनावर नियंत्रण ठेवणे आणि त्याला उत्तरदायी बनवणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. मात्र या जबाबदाऱ्यांची साखळी ज्या ठिकाणी तुटते तेथेच सामान्य नागरिकांच्या अडचणी सुरू होतात. नागरी सुविधा देण्यात प्रशासन अपयशी ठरल्यास निष्काळजीपणा, दिरंगाई किंवा भ्रष्टाचारामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागल्यास लोकप्रतिनिधींकडे तक्रार करणे हा नागरिकांचा लोकशाही हक्क आहे. परंतु दुर्दैवाने अनेक वेळा प्रशासन आणि राजकीय नेतृत्व यांची अभद्र युती तयार होते. अशा वेळी नागरिकांच्या तक्रारी दुर्लक्षित केल्या जातात आणि प्रश्न सोडविण्याऐवजी प्रश्न विचारणाऱ्यांनाच लक्ष्य केले जाते.

प्रशासनावर टीका केली, की ती थेट पक्षावर किंवा नेत्यावर टीका असल्याचा गैरसमज किंवा जाणीवपूर्वक निर्माण केलेला भ्रम पसरवला जातो. काही राजकीय समर्थक विचार न करता प्रशासनाच्या चुकीचे समर्थन करू लागतात. प्रत्यक्षात हे वर्तन भ्रष्टाचाराला बळ देणाऱ्या यंत्रणेचे रक्षण करणारे ठरते. प्रशासन आणि राजकीय नेतृत्व यांची अशी युती हीच संपूर्ण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचे मूळ आहे. इतिहास याबाबतीत आपल्याला मार्गदर्शन करतो. बगदादचा खलिफा हारून अल रशीद हा वेश बदलून सामान्य नागरिकांमध्ये फिरत असे, त्यांच्या अडचणी समजून घेत असे आणि आपल्या राजवटीतील कर्मचारी प्रामाणिकपणे काम करतात की नाही याची खातरजमा करत असे. कामचुकार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना तो कठोर शिक्षा देत असे. आजच्या काळात अशी प्रत्यक्ष फिरती शक्य नसली, तरी सोशल मीडियाच्या माध्यमातून सामान्य नागरिक प्रशासनातील अन्याय, निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचार रोजच समाजासमोर आणत आहेत.

या पार्श्वभूमीवर गरज आहे ती संवेदनशील, जबाबदार आणि लोकाभिमुख राज्यकर्त्यांची. सोशल मीडियावर व्यक्त होणाऱ्या तक्रारींची शहानिशा करून पीडित नागरिकांना न्याय देणे आणि दोषी, मुजोर अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, हे सक्षम प्रशासनाचे लक्षण आहे. नागरिकांची टीका ही व्यवस्थेच्या विरोधात नसून, व्यवस्थेच्या शुद्धीकरणासाठी असते, हे समजून घेण्याची परिपक्वता आवश्यक आहे. नागरिकांनी सातत्याने आपल्या समस्या मांडणे, शासकीय यंत्रणेतील चुका दाखवून देणे, हा लोकशाहीचा आत्मा आहे. असा दबाव निर्माण झाला तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना नाईलाजाने का होईना, पण योग्य, वेळेत आणि भ्रष्टाचारमुक्त काम करावे लागते. हाच या टीकेचा, या संघर्षाचा आणि या जागरूकतेचा खरा हेतू आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर प्रश्न विचारणाऱ्या नागरिकाला गप्प बसवण्याऐवजी, प्रश्न निर्माण होऊ नयेत यासाठी व्यवस्था सुधारणे, हाच खरा परिपक्वतेचा मार्ग आहे.

# सातबाऱ्यावरचा बोजा आता हटणार

## १९९० ते २०२५ पर्यंतच्या सर्व शेतकऱ्यांना मिळणार कर्जमाफी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाणार आहे. त्यासाठी ३० जून २०२५ व ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती सहकार विभागाने बँकांकडून मागविली आहे. १९९० पासूनचे थकबाकीदार आणि वारंवार कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचीही यात माहिती आहे.

### कर्जमाफीच्या अभ्यासासाठी समितीची नेमणूक

राज्य सरकारने कर्जमाफीच्या अभ्यासासाठी समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल पुढील दीड महिन्यात शासनाला सादर होणार आहे. त्यानंतर दिर्घकालिन उपाययोजना आणि कर्जमाफीचा निर्णय घेतला जाणार आहे. कर्जमाफीसाठी साधारणतः ४० हजार कोटी रुपये लागणार आहेत. ३० जून २०२५ पर्यंत राज्यातील २४ लाख ७३ हजार ५६६ शेतकऱ्यांकडे ३५ हजार ४७७ कोटींची थकबाकी आहे. २०२०- २१ ते २०२४- २५ या पाच वर्षांतील नियमित कर्जदार शेतकऱ्यांचीही माहिती सहकार विभागाने मागविली असून त्यांनाही प्रोत्साहनपर अनुदान मिळणार आहे.


कर्जमाफीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष ज्यांची माहिती शासनाला जाणार नाही, तेथील शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहू शकतात, असेही बोलले जात आहे. दरम्यान, थकबाकीदार शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार की काही लाखांची कर्जमाफी मिळणार ? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### थकबाकीची स्थिती

**एकूण शेतकरी : १, ३३, ४४, २०९**
**एकूण कर्जवाटप : २, ७८, २६५ कोटी**
**थकबाकीदार शेतकरी : २४, ७३, ५६६**
**शेकऱ्यांकडील थकबाकी : ३५, ४७७ कोटी**

### १४ जिल्ह्यात सर्वाधिक थकबाकी (कोटींमध्ये)

| | |
|---|---|
| सोलापूर | २, ७१, ९७३३, ९76 |
| पुणे | १, ०५, ६११२, ४९८ |
| नाशिक | ८१, ७९७२, ८२९ |
| परभणी | १, ५२, २०७१, ५०० |
| धाराशिव | ५२, ७१६१, ०९३ |
| नांदेड | १, ६५, ३१२१, २६८ |
| नागपूर | ६८, ७५११, १६३ |
| मुंबई | २४, ५३११, ०६३ |
| जालना | १, ७२, ६४८१, ९९२ |
| बुलढाणा | १, ६७, २७३१, ४७१ |
| बीड | १, १९, १८८१, ४६४ |
| छ. संभाजीनगर | १, ०४, ४२९१, ६०० |
| अमरावती | १, १७, ४०२१, ३६० |
| अहिल्यानगर | ५८, ६१११, ४८१ |





अमळनेर : तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले जि. प. अधिकारी, कर्मचारी व शिक्षक.

# तालुकास्तरीय जि. प. अधिकारी, कर्मचारी, शिक्षक क्रीडा स्पर्धा उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुकास्तरीय जि. प. अधिकारी, कर्मचारी व शिक्षक क्रीडा स्पर्धांचे सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. तालुका क्रीडा संकुलात क्रिकेट, रस्सीखेच, रनिंग, कॅरम, बुध्दीबळ, प्रताप महाविद्यालयात बॅडमिंटन, व्हॉलीबॉल व स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलमध्ये सांस्कृतिक (गायन, नृत्य व नाटिका) स्पर्धा झाल्या. खासदार स्मिताताई वाघ व आमदार अनिलदादा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीष गोसावी, शिक्षण विस्तार अधिकारी रावसाहेब पाटील, गटसमन्वयक रवींद्र पाटील, केंद्रप्रमुख शरद सोनवणे, चंद्रकांत साळुंके, किरण शिसोदे, अशोक सोनवणे, दिलीप सोनवणे, राजेंद्र गवते, सुनिल चौधरी व छगन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा समन्वयक म्हणून उपशिक्षक दत्तात्रय सोनवणे, विलास मोरे, डॉ. कुणाल पवार, क्रीडा समन्वयक क्रीडा शिक्षक सुनील वाघ, कैलास बाविस्कर, संयोजक म्हणून देवेंद्र पाटील यांनी काम पाहिले.

पंच, परिक्षक म्हणून- सुनील वाघ, कैलास बाविस्कर, बापूराव सांगोरे, स्वप्निल पाटील, जयेश मासरे, गोकुळ बोरसे, अतुल बोरसे, सॅम शिंगाणे, जितेंद्र बाविस्कर, सुनील करंदीकर, रामेश्वर घुगे, महेश माळी, दर्शन पाटील, कृष्णा वर्मा, राहुल भावसार, महेश्वर बोरसे, पुरब निकम, विजया गायकवाड व संगिता बाविस्कर यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक विभाग गायन (पुरुष) प्रथम - सोमनाथ विसपुते (शिक्षण), द्वितीय - चंद्रकांत पाटील (शिक्षण), तृतिय - प्रेमराज पवार (शिक्षण), नृत्य (महिला) प्रथम - डॉ.पूजा वाघुले/पंजवाणी (आरोग्य), नाटिका (पुरुष) प्रथम - योगेश कापडणे (आरोग्य).

### क्रीडा प्रकार निहाय निकाल

**रनिंग (पुरुष) :** विजेता - अजय बोरसे (शिक्षण), उपविजेता - अक्षय पाटील (बांधकाम), रनिंग (महिला), विजेता - रुपाली पाटील (शिक्षण), उपविजेता - रोहिणी पाटील (शिक्षण), रस्सीखेच (पुरुष), विजेता - बांधकाम विभाग, उपविजेता - आरोग्य विभाग, रस्सीखेच (महिला) विजेता - शिक्षण विभाग, क्रिकेट (पुरुष) विजेता - बांधकाम विभाग, उपविजेता - आरोग्य विभाग, बुध्दिबळ (पुरुष), विजेता - दिपक बोरसे (बांधकाम), उपविजेता - संजय महाजन (शिक्षण), बुध्दिबळ (महिला), विजेता - मंगल नागरे (शिक्षण), कॅरम (पुरुष) विजेता - संजय महाजन (शिक्षण) उपविजेता - सागर नराल (आरोग्य), बॅडमिंटन (पुरुष) विजेता - डॉ.गिरीष गोसावी (आरोग्य), उपविजेता- संजय जगताप (शिक्षण), बॅडमिंटन (महिला), विजेता - डॉ.साक्षी बोरसे (आरोग्य), उपविजेता - कविता पाटील (शिक्षण)

# हेडावे येथे माता रमाई यांना प्रबोधन गीतातून अभिवादन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : त्यागमूर्ती रमाई जयंतीनिमित्त तालुक्यातील हेडावे येथे प्रबोधन गीतांचा कार्यक्रम उत्साहात झाला. प्रा अशोक पवार यांच्या युवा कल्याण प्रतिष्ठान अमळनेर व राष्ट्रीय कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रमाई गीतांच्या कार्यक्रमाने वातावरण प्रबोधनमय झाले होते. माता रमाईंच्या त्यागाची गाणी गाऊन यावेळी त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात माता रमाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमात प्रसिद्ध गीतकार प्रतापसिंग बोदडे, ब्रह्मानंद थोरात यांचे गीते स्थानिक कलाकार, गायक किरण चव्हाण यांनी "माझ्या कंठात गंधार स्वर", "माझ्या भिमाच्या नावाचं" यांसारखी गाणी सादर करून रमाईंचे संघर्षमय जीवन आणि त्यागाचे दर्शन घडवले. तसेच कवी, गायक अजय भामरे यांनी गायिलेल्या " आर्पिले भीमाला जीवन रमाईने " माता रमाईंनी बाबासाहेबांना दिलेल्या निस्सीम पाठिंब्याची आणि त्यांच्या त्यागाची आठवण या प्रबोधन गीतांतून जागवण्यात आली. हार्मोनियम वादक कमलाकर संदानशिव, इंजि. उज्वल पाटील, डी. ए. पाटील, बापूराव ठाकरे, चंद्रकांत मैलागिर, टिनू संदानशिव यांसह कला मंचचे आदी कलाकारांनी प्रबोधनपर गीते सादर केली. ज्यामुळे हेडावे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी महिलांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. प्रा. के. पी. बागुल (उपसरपंच- हेडावे ), वसंत ढिवरे, सुधाकर बैसाणे, महेंद्र ब्रह्मे, सुशांत ढिवरे, भय्यासाहेब ढिवरे, रवींद्र साळुंखे, सचिन साळुंखे, रितेश ढिवरे, पंकज ढिवरे, समाधान वानखेडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



हेडावे (ता. अमळनेर) : रमाई जयंतीनिमित्त गीतातून प्रबोधन करताना कवी अजय भामरे आदी.

# बनावट देशी- विदेशी मद्य निर्मिती कारखाना उद्ध्वस्त

पान १ वरून

या छाप्यात १० हजार ५६० रुपयांच्या ४८ विदेशी मद्याच्या बाटल्या १ हजार २१० रुपयांच्या ६१० नग देशी मद्याच्या बाटल्या, ४ हजार रुपयांचा एक सीलबंद बॉक्स, ४५ हजार रुपयांचे देशी-दारू निर्मितीचे भरलेले १०० लिटर ड्रम , ४७ हजार २५० रुपयांचा १०५ लिटरचे देशी मद्य निर्मितीचे कॅन, २५ हजार रुपयांचे सील बंद करण्याचे मशीन, ३० हजार ५५० रुपयांचे विदेशी मद्य तयार करण्याचे ब्लेड, ५० हजार रुपयांची मोटरसायकल तसेच दारू वाहतुक करताना आढळून आलेली ८५ हजार रुपये किमतीची मोटरसायकल (एमएच१८सीजी१५४९) यासह खाली बाटल्या असे एकूण ३ लाख १ हजार ७३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीना अटक करून महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यत आला आहे. जी. एस. मोरे तपास करीत आहेत.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाचा दुहेरी आधार

## आमदार अनिलदादा पाटील; तालुक्यासाठी १९ कोटी ८० लाखांची रक्कम प्राप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने दुहेरी लाभ देवून आधार दिला आहे. सुमारे ३९ हजार ५४१ शेतकऱ्यांना नुकसानभरपाईपोटी १९ कोटी ८० लाख रुपये तर मिळालेच आहेत. मात्र, त्यांचा खरीप हंगाम वाया गेला असल्याने रब्बी हंगामात बियाणे खरेदीसाठी हेक्टरी १० हजार रुपये मंजूर केले आहेत, अशी माहिती आमदार अनिलदादा पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रान्वये दिली आहे.




प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे, की गेल्यावर्षी दि. ३० व ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यामुळे शेतकरी बांधवाचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार अनिलदादा पाटील यांनी झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्याने तातडीने पंचनामे झाले होते. पंचनाम्यानंतर आमदार अनिलदादा पाटील यांनी वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे सदर १९ कोटी ८० लाख रुपये रक्कम पीडित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून प्राप्त झालेली आहे. या सोबतच ऑक्टोबरमध्ये झालेल्या अतिवृष्टी व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रब्बी पिकासाठी मदत म्हणून बियाणे खरेदी करण्यासाठी हेक्टरी १० हजार रुपये सुद्धा शासनाने यावेळी मंजूर केले आहेत. शेतकऱ्यांना आमदार अनिलदादा पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे दुहेरी लाभ मिळाला आहे. त्यामुळे अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

### ॲग्रीस्टॅक क्रमांकानुसार रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात

सदरच्या १९ कोटी ८० लाखसाठी रकमेसाठी ईकेवायसी करणे बंधनकारक नाही. शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक क्रमांकानुसार ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर पडणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करून ग्राममहसूल अधिकारी म्हणजेच तलाठी यांना द्यावी. जेणेकरून लवकरात लवकर शेतकरी बांधवांच्या खात्यावर रक्कम पडेल. दरम्यान, शासनाने वेळोवेळी ॲग्रीस्टॅक क्रमांक काढण्यासाठी जो आग्रह केला त्याचाच फायदा शेतकऱ्यांना आज तात्काळ मिळाला असून, शेतकऱ्यांना केवायसी करण्यासाठी सुविधा केंद्रावर वारंवार जाण्याची गरज नाही. ॲग्रीस्टॅक क्रमांक काढण्यासाठी अमळनेर तहसीलदार यांनी योग्य ते नियोजन केले. त्यामुळेच हा पैसा विना केवायसी शेतकऱ्यांच्या खात्यावर डायरेक्ट ॲग्रीस्टॅक क्रमांकानुसार पडल्याचे आमदार अनिलदादा पाटील यांनी सांगितले. तसेच पीडित शेतकरी बांधवाना दुहेरी लाभ दिल्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री व पालकमंत्री यांचे आभार मानले आहे.

# पाणीपुरवठ्याची वेळ बदलविण्याची पालिकेकडे मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील कसाली भागात पहाटे पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाणी भरण्यास अडचणी येतात. ही वेळ बदलण्यात यावी, अशी मागणी कसाली परिसरातील नागरिकांनी केली आहे. याबाबत पालिकेस त्यांनी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की पालिकेतर्फे होणारा पाणीपुरवठा पहाटे चारला होतो. ही झोपेची वेळ असल्याने पाणी येते केव्हा आणि जाते केव्हा ? हे कळतही नाही. विशेषतः महिलांना याचा त्रास सहन करावा लागतो. गैरसोय होत असल्याने पाणी पुरवठ्याची वेळ बदलून सकाळी ७ ते ९ किंवा सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान करण्यात यावी. निवेदनावर युवा नेते नईम पठाण, अफरोज मस्त्री, ईस्त्याक मोलाना, जुनेद शेख, राजा पठाण, रिजवान मन्यार आदींच्या सह्या आहेत.


# पाहिजेत

| | |
|---|---|
| पद : | ट्रेनिंग ऑफिसर (प्रशिक्षण अधिकारी) |
| पगार : | १५ हजार ते २0 हजार (दरमाह) |
| पात्रता : | अमळनेर तालुक्यातील कॉम्प्युटर्स, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल आणि ई & टीसी इंजिनियर्स, बीएससी, एम एस सी कम्प्युटर, एम. सी. ए, एम. बी. ए, एम.सी. एम. (एम.बी.एम.) क्षेत्रातील मुला-मुलींसाठी नामांकित ड्रोन टेक्नॉलॉजी, रोबोटिक टेक्नॉलॉजी आणि इंडस्ट्री टेक्नॉलॉजी ४.0 स्टार्टअप क्षेत्रातील कंपनीमध्ये रोजगाराची सुवर्णसंधी. |
| टीप : | पात्रता धारक उमेदवारांनी आपले शैक्षणिक परिचय पत्र दि. १४ फेब्रुवारी,२०२६ पर्यंत व्हाट्सअप क्रमांक ८८८८५६७४५१ वर पाठवा. |
| मुलाखत : | रविवार, दि. १५ फेब्रुवारी, २०२६ रोजी |
| स्थळ : | डी. आर. टी फ्लाय प्रायव्हेट लिमिटेड, निकुंभ कॉम्प्लेक्स आठवडे बाजार, पहिला मजला, अमळनेर |
| वेळ : | सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत |

DRT FLY PVT. LTD.
NATIONAL MISSION FOR INNOVATION

## नवोपक्रमासाठी राष्ट्रीय मिशन

डी. आर. टी. फ्लाय प्रायव्हेट लिमिटेड ही भारत सरकार मान्यता प्राप्त स्टार्टअप कंपनी असून, राष्ट्रीय कल्पकता अभियान हे आमचे घोषवाक्य आहे. आम्ही शालेय पातळीपासून उच्च शिक्षणापर्यंत ड्रोन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स आणि रिमोट सेन्सिंग क्षेत्रातील कौशल्यपूर्ण शिक्षण प्रदान करतो.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मेथी वर्षभर ताजी ठेवण्यासाठी सोपे घरगुती उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकांना मेथी खायला आवडते. मेथीची भाजी खाणे चांगले आहे. परंतु मेथी साठवून ठेवणे अनेकांना शक्य होत नाही. मेथी साठवून ठेवल्याने खराब होऊ शकते. त्यामुळे अनेक जण साठवून ठेवत नाहीत. हिवाळ्यात उपलब्ध असलेली ताजी मेथी आता वर्षभर ताजी ठेवता येते. मेथीची चव आणि सुगंध तुमच्या भाज्या आणि पाककृतींमध्ये दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी काही सोप्या पद्धती वापरून वाळवा आणि साठवा.
हिवाळ्यात पालकपासून अनेक हिरव्या भाज्या येतात. मेथी त्यापैकी एक आहे. मेथी हिवाळ्यात हंगामात येते आणि ती अनेक थंड हवामानातील भाज्यांमध्ये वापरली जाते. ताज्या मेथीचा सुगंध आश्चर्यकारक असतो आणि हिवाळ्यात त्याची किंमत देखील लक्षणीयरीत्या कमी असते. या कारणास्तव लोक घरी ताज्या मेथीचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी भरपूर प्रमाणात मेथीचा साठा करतात. पण हिवाळा संपताच ते लवकर खराब होऊ लागते आणि कधी-कधी लोकांना भरपूर मेथी मिळते जी खराब होते. ज्यामुळे ती फेकून द्यावी लागते. जर तुमच्यासोबत असे घडले असेल तर काळजी करू नका; यावेळी असे होणार नाही. खरे तर काही सोप्या घरगुती उपायांनी तुम्ही मेथी सुकवू शकता आणि ती एक वर्षापर्यंत ताजी ठेवू शकता. चला या सोप्या आणि उपयुक्त पद्धतींचा शोध घेऊया. ज्या तुम्हाला हिवाळा संपल्यानंतरही वर्षभर मेथीचा आनंद घेण्यास मदत करतील.

**मेथी स्वच्छ करा**

जर तुम्हाला हिवाळ्यापूर्वी मेथीची पाने साठवायची असतील, तर तुम्हाला ती पूर्णपणे स्वच्छ करावी लागतील. मेथीची पाने पूर्णपणे धुवावीत. जेणे करून सर्व घाण आणि घाण निघून जाईल. नंतर साठवण्यापूर्वी पाने ओलावामुक्त राहतील याची खात्री करण्यासाठी त्यांना हलकेच हलवावे. जर तुम्हाला हिवाळ्यापूर्वी मेथीची पाने साठवायची असतील, तर तुम्हाला ती पूर्णपणे स्वच्छ करावी लागतील. मेथीची पाने पूर्णपणे धुवावीत. जेणे करून सर्व घाण आणि घाण निघून जाईल. नंतर साठवण्यापूर्वी पाने ओलावामुक्त राहतील याची खात्री करण्यासाठी त्यांना हलकेच हलवावे.

१) **एअर फ्रायर पद्धत** : जर तुमच्याकडे एअर फ्रायर असेल, तर मेथीची पाने ११००८ वर सुमारे १५ मिनिटे वाळवावीत. पाने समान रीतीने सुकतील याची खात्री करण्यासाठी अधूनमधून हलवावीत. पाने पूर्णपणे कुरकुरीत आणि कोरडी झाल्यावर ती साठवण्यासाठी तयार असतात.

२) **एअर फ्रायरशिवाय** : जर तुमच्याकडे एअर फ्रायर नसेल तर काळजी करू नका. तुम्ही मेथीशिवायही वाळवू शकता. मेथी सावलीत पसरवा आणि पूर्णपणे सुकेपर्यंत ४-५ दिवस वाळवा. अशा प्रकारे वाळवलेले मेथी एक वर्षापर्यंत साठवता येते.

३) **योग्य कंटेनर निवडा** : वाळलेल्या मेथीच्या पानांना स्वच्छ, कोरड्या आणि हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा. मेथीच्या पानांचा सुगंध आणि चव बराच काळ टिकवून ठेवण्यासाठी झाकण घट्ट बंद करा.

४) **रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा** : जर तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही ही वाळलेली मेथी अनेक महिने रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू शकता. गरज पडल्यास, ती काढून टाका आणि मसूर, भाज्या किंवा इतर कोणत्याही रेसिपीची चव वाढवण्यासाठी वापरा.



## पाकिस्तानचे टेन्शन वाढणार!

# भारत-पाक सामन्यात अभिषेक शर्मा खेळणार?


## वरुण चक्रवर्तीने दिली मोठी अपडेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत दमदार कामगिरी केली आहे. भारतीय संघाने स्पर्धेतील पहिल्या सामन्यात अमेरिकेचा, तर दुसऱ्या सामन्यात नामिबियाचा एकतर्फी पराभव केला. या दमदार कामगिरीसह भारतीय संघाने टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेच्या गुणतालिकेत अव्वल स्थान गाठले आहे. भारतीय संघाचा पुढील सामना कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. हा सामना १५ फेब्रुवारीला श्रीलंकेतील कोलंबोत खेळविला जाणार आहे. या सामन्याआधी भारतीय संघाचे टेन्शन वाढले आहे. कारण स्फोटक फलंदाज अभिषेक शर्मा पूर्णपणे फिट नसल्यामुळे नामिबियाविरुद्धच्या समान्यात खेळू शकला नव्हता. दरम्यान, तो पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी उपलब्ध राहणार का? याबाबत वरुण चक्रवर्तीने मोठी अपडेट दिली आहे.

भारत आणि नामिबिया या दोन्ही संघांदरम्यान झालेला सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर पार पडला. या सामन्यातील नाणेफेकीवेळी सूर्यकुमार यादवने अभिषेक शर्माच्या फिटनेसबद्दल अपडेट दिली होती. त्याने स्पष्ट सांगितले होते, की तो अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे तो १-२ सामने बाहेर राहू शकतो. यावरून असा अंदाज लावला जात होता, की तो पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून बाहेर होऊ शकतो. पण आता वरुण चक्रवर्तीने दिलेल्या अपडेटनुसार अभिषेक शर्मा पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात खेळताना दिसू शकतो.





# ५४० कमांडो मरे हुए छोड़ दिए गए

## एक महिला पायलट ने नियम तोड़े और पूरी टुकड़ी को बचा लिया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज़रा कल्पना कीजिए। ५४० भारतीय कमांडो, दुश्मन के कब्ज़े वाले पहाड़ी इलाके में फँसे हुए। गोला-बारूद लगभग खत्म। चारों ओर से दुश्मन की गोलियाँ पहाड़ियों को रोशन कर रही थीं। और मुख्यालय में शहीदों की सूची पहले ही तैयार की जा रही थी।
प्रोटोकॉल कहता था : डटे रहो।
सैन्य सिद्धांत कहता था : पीछे हटो।
लेकिन उस पल, जब इंतज़ार करना ही मौत के बराबर था । एक नज़रअंदाज़ की गई पायलट ने स्क्रिप्ट मानने से इनकार कर दिया।

**यह कहानी है कैप्टन अनन्या राव की**
भारतीय वायुसेना की वह पायलट, जिसे 'ज़रूरी नहीं' मानकर किनारे कर दिया गया था, जिसने कंट्रोल स्टिक को कसकर पकड़ा और एक पूरी बटालियन को ज़िंदा घर वापस ले आई। छावनी के डाइनिंग हॉल में हँसी-मज़ाक गूँज रहा था। कमांडो गश्त से पहले पेट और फेफड़े भर रहे थे। लेकिन ट्रे और चुटकुलों से अलग, एक कोने में एक महिला अकेली बैठी थी ज़मीन पर बिछी तिरपाल पर, बगल में फ़्लाइट हेलमेट, और गोद में नेविगेशन पैड। २७ वर्षीय कैप्टन अनन्या राव, आयएएफ की जगुआर स्ट्राइक एयरक्राफ्ट पायलट, घड़ी की तरह सटीक हरकतों के साथ काम कर रही थी। हर मूवमेंट सोच-समझकर, ठोस, बिना जल्दबाज़ी। कद में छोटी कई सैनिकों से कम लंबी लेकिन कॉकपिट में वह ऐसे फिट बैठती थी जैसे उसी के लिए बनी हो। जहाँ दूसरे पायलट शेख़ी बघारते थे, अनन्या शांति से चेकलिस्ट दोहराती, वेपन सिस्टम की स्क्रीन जाँचती, और हवा, भार व संतुलन के नोट्स लिखती।

**उसका विमान सिर्फ़ मशीन नहीं था। वह उसकी एकाग्रता का विस्तार था।**
वह हर सेटिंग को ऐसे दर्ज करती जैसे कोई पवित्र ग्रंथ हो तोप की कंपन अलग-अलग गति पर, हार्डपॉइंट्स का भार, रिकॉयल पैटर्न, और गर्म दिन में कैनन की "साँस" कैसी बदलती है। दो जवान हँसते हुए बैरक की ओर गए। 'देखो, कोटा पायलट,' एक ने जानबूझकर ऊँची आवाज़ में कहा। 'काग़ज़ी पायलट,' दूसरा हँसा, 'अच्छा है, कार्डबोर्ड ट्रिगर नहीं दबाता।' वे रुके नहीं। जवाब की उम्मीद भी नहीं थी। अनन्या ने नज़र नहीं उठाई। एक और चेक पूरा किया, एक और लाइन लिखी। यह सब वह पहले भी सुन चुकी थी बोझ। शोपीस। फाइल में टिक किया गया नाम। पायलट बहुत छोटी, बहुत शांत, बहुत अलग तीन-तीन तैनातियाँ देख चुके कठोर हवलदार तक उसे सिर्फ़ "डेस्क एसेट" मानते थे। 'राव सिम्युलेटर के लिए ठीक है,' एक ऑपरेशंस अफ़सर ने कहा। 'उसे सपोर्ट में रखो, कम्युनिकेशन सँभालने दो।' और वैसा ही हुआ। लॉजिस्टिक्स। उपकरण ढोना। रेडियो चेक। कोई उसे पहाड़ी मोर्चों पर नहीं भेजता था। कोई नहीं चाहता था कि वह वास्तविक लड़ाई में विमान उड़ाए। उसे शालीनता से कहा गया 'अपनी लेन में रहो।'

जिस बात को किसी ने कभी नहीं देखा क्योंकि देखने की ज़हमत ही नहीं उठाई वह यह थी कि अनन्या राव ने चुप्पी भरी रातों में अपना खुद का उड़ान-कार्यक्रम बनाया। जब दूसरे लोग स्मोकिंग ज़ोन में हँसी-मज़ाक करते, वह लाल रोशनी वाली टॉर्च के नीचे टोपोग्राफ़िक मैप फैलाकर बैठती, घाटियों, पहाड़ी कटावों और दुश्मन की संभावित फायर लाइनों को तब तक याद करती जब तक नक्शा उसके दिमाग़ में ज़िंदा न हो जाए। वह हवा की दिशा, रोटर करंट, और अचानक बदलती झोंकों को ट्रैक करती यह नोट करते हुए कि हर छोटी चीज़ कैसे जान बचा सकती है।

# सरकारी नोकरी, मानसन्मान, पैसाअडका स्वप्नवत असताना अचानक नोकरीचा राजीनामा देणाऱ्या मुलीला काय म्हणाल?

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वयाच्या २१ व्या वर्षी सरकारी नोकरी, मानसन्मान, पैसाअडका असे सगळे स्वप्नवत असताना अचानक नोकरीचा राजीनामा देणाऱ्या मुलीला तुम्ही काय म्हणाल? कदाचित बेजाबदार किंवा लहरी म्हणाल. पण समाज 'ति'ला 'हिरकणी' म्हणतो आहे, 'द रियल हिरोज' या पुरस्काराने सन्मानित करतो आहे.

पोलीस निरीक्षक पदाची नोकरी सोडून अनेक अनाथ, गरीब, मनोरुग्णांसाठी कार्य करणारी 'द रियल हिरो'. २७ डिसेंबर २०१६ ला 'ती' विवाहबंधनात अडकली. लग्नातील अनावश्यक खर्चाला फाटा देत तिने नोंदणी पद्धतीने लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्नाच्या दिवशी तिने व तिच्या जोडीदाराने रक्तदान केले. एवढेच नव्हे, तर त्यांच्या लग्नाला आलेल्या इतर मंडळींनी देखील रक्तदान केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लग्नाच्याच दिवशी या नवीन जोडप्याने ५ अनाथ मुलींचे पालकत्व घेऊन एक वेगळा आदर्श निर्माण केला. कोण आहे ती? ही आहे गुंजन गोळे. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात एका सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेली ही मुलगी आज तिच्या कर्तृत्वाने महाराष्ट्र गाजवते आहे. हो! शब्दशः गाजवते आहे. गुंजनने अमरावतीत गवळीगड येथे महिला ढोल पथक सुरु केले आणि राज्यातील पहिले महिला ढोल पथक सुरू करण्याचा मान तिला मिळाला. या पथकात आज १५० महिला आहेत. तत्त्वज्ञानामध्ये एम. ए. केल्यानंतर गुंजनने स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यास सुरूवात केली. प्रचंड कष्ट आणि मेहनतीने अभ्यास केला.



यूपीएससीमधील कम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेसची परीक्षा तिने दिली आणि ती उत्तीर्ण देखील झाली. त्यानंतर तिने पोलीस उपनिरीक्षकपदासाठी परीक्षा दिली आणि तिने त्यातही यश मिळविले. लहानपणी गुंजनने पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले. आई-वडील आणि तिच्या स्वतःच्या कष्टाचे चीज झाले. गुंजन पोलीस निरीक्षक पदावर रुजू झाली. दिवसरात्र मेहनत करून मिळविलेल्या नोकरीचा गुंजनने एक दिवस राजीनामा दिला. आश्चर्य वाटले ना? पण हा राजीनामा नोकरीचा कंटाळा आला. काम जमलेच नाही, वरिष्ठांचा दबाव आला म्हणून दिला नव्हता. राजीनामा देण्यामागे एक विचार होता. एक ध्येय होते. वेगळ करून दाखविण्याची जिद्द होती. समाजसेवेची ओढ होती. हे सगळे करण्यासाठी गुंजनला प्रेरित करणारा प्रसंगही तसाच घडला होता.

एके दिवशी रात्री ड्युटी आटोपून घरी परतत असताना गुंजनला एक मनोरुग्ण महिला अर्धानग्न अवस्थेत रस्त्याच्या कडेला दिसली. त्या महिलेच्या अंगावर जेमतेम कपडे होते. केस सुटलेले, अनेक दिवस अंघोळ न केल्याने ती विचित्र दिसत होती. त्यातच ती गरोदर आहे हे गुंजनच्या लक्षात आले. नक्कीच कोणीतरी नराधमाने तिला आपल्या वासनेचे शिकार केले असणार. ते दृश्य बघून गुंजनला खूप रडू आले. किळस वाटली. स्वतःला माणूस म्हणवून घ्यायची लाज वाटायला लागली. गुंजनने सगळा धीर एकवटला. ती गाडीतून उतरली. त्या महिलेला घेऊन तिची योग्य ती सोय लावण्याचा तिने ठाम विचार केला आणि अजून एक विचार केला, तो म्हणजे अशा महिलांसाठी कार्य करण्याचा. तिचा विचार पक्का झाला आणि अतिशय कष्टाने मिळवलेल्या नोकरीचा गुंजनने राजीनामा दिला. आधीची पोलीस निरीक्षक गुंजन आता रस्त्यांवरील मनोरुग्ण, वयस्क, अनाथ आजी-आजोबा, मुले यांचा आधार झाली.
आता गुंजनचा दिवस पहाटे केव्हा सुरू होतो आणि केव्हा संपतो हे तिला देखील कळत नाही. ती अमरावती परिसरातील गरीब-गरजू मुलांना सैनिक भरतीचे प्रशिक्षण देते. स्पर्धा परीक्षांचे क्लासेस घेते. ढोल पथकाचा सराव घेते. महिला व मुलींना स्वरक्षणाचे धडे देते. साहसी खेळ जसे लाठी-काठी, तलवारबाजी, दांडपट्टा हे शिकवण्याच्या कार्यशाळा महाराष्ट्रभर आयोजित करते. विशेष म्हणजे, या सगळ्यातून मिळणारे पैसे ती समाजकार्यात वापरते. संध्याकाळी आपल्या दुचाकीवर बसून बिस्किटाचे पुडे, पाण्याच्या बाटल्या, छोटे हातरुमाल अशा विविध साहित्याने भरलेली बॅग घेऊन रस्त्यांवर कोणी उपाशी झोपले आहेत का, थंडीत कुडकुडते आहे का? याचा ती शोध घेते आणि गरजूंना ते साहित्य देते.
आजवर कित्येक नवजात बालकांना तिने मृत्यूच्या जबड्यातून वाचवले आहे. अनैतिक संबंधातून जन्माला आलेल्या आणि रस्त्यावर फेकून दिलेल्या अनेक नवजात शिशूंना तिने जीवदान दिले आहे. तिच्या पुढाकाराने अनेक मनोरुग्ण, कृष्टरोगी यांच्यावर उपचार सुरू आहेत. गुंजन एक उत्तम गिर्यारोहक देखील आहे. दरवर्षी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला ती कळसूबाईचे शिखर सर करते आणि कळसूबाईवर तिरंगा फडकावते. आतापर्यंत १४ वेळा तिने हे शिखर सर केले आहे. गुंजनशी बोलताना तिचा बिनधास्त स्वभाव, समाजासाठी वाटणारी तळमळ शब्दाशब्दातून जाणवते. या मुलाखतीत तिने एकदाही स्वतःला मिळालेल्या कोणत्याही सन्मानांचा किंवा पुरस्कारांचा उच्चार देखील केला नाही. ज्याप्रमाणे पाच मुली दत्तक घेतल्या तशाच ५०० मुली दत्तक घेण्याचा गुंजनचा मानस आहे. महाराष्ट्रात एकही मनोरुग्ण, अनाथ, वयोवृद्ध रस्तावर बेवारस अवस्थेत राहू नये. असं तिला मनापासून वाटतं. पैशाअभावी किंवा वेळीच उपचार न मिळाल्याने जेव्हा एखादा माणूस दगावतो तेव्हा ती स्वतःला फार असहाय्य समजते. या सर्वांची दखल समाज कुठेतरी घेत होता. ८ जानेवारीला तिला 'द रियल हिरोज' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिच्यावर लिहिलेल्या 'काही देणे लागतो' या डॉ. सुभाष गवई यांच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पुण्यभूमी तपोवन येथे पार पडला. तिला 'हिरकणी' पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे. गुंजनने आतापर्यंत २ वेळा राष्ट्रीय रायफल शूटिंगमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. २६ जानेवारीच्या परेडमध्ये देखील तिला महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. एकाच वेळी घर, समाज आणि राष्ट्र अशा तीनही आघाड्यांवर आपल्या कार्यकर्तृत्वाने एक वेगळी मुद्रा उमटविणाऱ्या गुंजनला दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा!


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# शनी प्रदोष म्हणजे काय? जाणून घ्या पौराणिक कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनी प्रदोष व्रत भगवान शिव, माता पार्वती आणि शनी देव यांची पूजा करण्यासाठीचा दिवस आहे. असे मानले जाते, की प्रदोष काळात भगवान शिव स्वयं शिवलिंगात प्रकट होतात आणि यावेळी भगवान शंकर यांची पूजा केल्यास विशेष फल प्राप्ती होते. शनी प्रदोष व्रत केल्याने शनीशी संबंधित अशुभ दूर होतात आणि शनी देव शांत राहतात. शास्त्रानुसार शनी प्रदोष व्रत केल्यास व्यक्तीला दीर्घायुष्यासह सुख-समृद्धी प्राप्त होते. याशिवाय कुंडलीत शनीच्या शुभतेसोबतच चंद्रही लाभ देतो.

या दिवशी कोणीही शनी देवाची पूजा पूर्ण भक्तिभावाने आणि मनापासून केल्यास त्याचे सर्व संकट आणि कष्ट नक्कीच दूर होतात आणि शनी देवाचा प्रकोप, शनी साडेसाती किंवा ढैय्याचा प्रभावही कमी होतो. शनी प्रदोष व्रतात प्रदोष काळात आरती आणि पूजा केली जाते. सायंकाळी जेव्हा सूर्यास्त होतो आणि रात्र येते तेव्हा त्या आक्रमणाला प्रदोष काल म्हणतात.

साधारण प्रदोष व्रत पूजा दुपारी ४.३० ते सायंकाळी ७.०० या दरम्यान केली जाते. या दिवशी 'ॐ नमः शिवाय' मंत्राचा जप करत महादेवांना जल अर्पित करावे आणि 'ॐ शं शनैश्चराय नमः' मंत्राचा जप करणे देखील शुभ मानले जाते.

## व्रताचे महत्त्व

द्वादशी, त्रयोदशी तिथीला प्रदोष व्रत केले जाते. जर एखाद्या व्यक्तीला भगवान शंकर यांना प्रसन्न करायचे असेल तर त्याने प्रदोष व्रत केले पाहिजे. या व्रताचे पालन केल्याने भगवान शिव प्रसन्न होऊन भक्ताला सर्व सांसारिक सुख व पुत्रप्राप्तीचे वरदान प्रदान करतात. म्हणून या दिवशी पूर्ण भक्तिभावाने भगवान शंकर यांची पूजा केल्यास सर्व संकटे दूर होतात. शनीचा प्रकोप तसेच साडेसाती किंवा ढैय्याचा प्रभाव कमी होतो. सायंकाळी प्रदोष कालात आरती आणि पूजा केली जाते. या वेळेला प्रदोष काल म्हणतात. यासोबतच या दिवशी शनी देवाची पूजा करावी.



## शनी प्रदोष व्रत कथा

शनी प्रदोष व्रताच्या पौराणिक कथेनुसार प्राचीन काळी एक मोठा व्यापारी होता. त्याच्या घरात सर्व प्रकारच्या सुख-सुविधा होत्या. पण मुले नसल्यामुळे पती-पत्नी नेहमी दुःखी असायचे. बरेच विचारमंथन केल्यावर व्यापाऱ्याने आपले काम सेवकांकडे सोपविले आणि स्वतः पत्नीसह तीर्थयात्रेला निघाला. जेव्हा ते आपल्या शहरातून बाहेर आले तेव्हा त्यांना ध्यानस्थ बसलेला एक साधू दृष्टीस पडला. व्यापाऱ्याने विचार केला, की ऋषींचे आशीर्वाद घेऊन पुढचा प्रवास का करू नये.

दोघे साधू जवळ बसले. जेव्हा साधूने डोळे उघडले तेव्हा त्यांना कळले, की पती-पत्नी बराच वेळ आशीर्वादाची वाट पाहत बसले होते. त्यांना बघून साधू म्हणाले, की मला तुमचे दुःख माहीत आहे. तुम्ही शनी प्रदोष व्रत करा. यामुळे तुम्हाला संततीचे सुख मिळेल.

साधूने दोघांना प्रदोष व्रत विधी सांगितला आणि महादेवांची वंदना देखील सांगितली.

हे नीलकंठ सुर नमस्कार। शशि मौलि चन्द्र सुख नमस्कार।।

हे उमाकांत सुधि नमस्कार। उग्रत्व रूप मन नमस्कार।।

ईशान ईश प्रभु नमस्कार। विश्वेश्वर प्रभु शिव नमस्कार।।

दोघे साधूंचा आशीर्वाद घेऊन तीर्थयात्रेसाठी पुढे निघून गेले. तीर्थयात्रेहून परतल्यानंतर पती-पत्नीने शनी प्रदोष व्रत केले. ज्याच्या प्रभावाने त्यांच्या घरी एक सुंदर पुत्राचा जन्म झाला.

## मारुतीचे पद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जय कपीश हे हनुमंता।
सोडवा या भवसागरतुनी आता।।धृ।।

आमुचा हनुमंत राम भक्त।
वर्ण ज्याचा असे आरक्त।
घेउनी गदा हस्ते मजबूत।
लावी शत्रूस पळवून आता।।१।।

लक्ष्मणास लागता शक्ती।
घेउनी संजीवनी पर्वत हस्ती।
उठविसी सौमित्रास त्वरीती।
असा पराक्रमी तू समर्था।।२।।

हरि रूप तुझे सुंदर।
कटीस शोभे कौपिन मनोहर।
यज्ञोपवीत शोभे गळा, खांद्यावर।
असा हा नटरंगी शिव सुंदर।।३।।

तुझी कोटीच्या कोटी उड्डाणे।
स्मर मात्रे हो भय हारणे।
अणूपासुनी ब्रह्मान्ड तव होणे।
हो कृपावंत आता।।४।।

श्रीरामाच्या सहाय्यास धावला।
दास्य भक्तीचा आदर्श दिला।
आम्ही दास शरण चरणाला।
प्रमोदे तुज हरि मुखा
आळविला।।५।।

। महारुद्र हनुमान की जय ।

# शनी प्रदोष दिनी काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी शनी प्रदोष आहे. हा योग अतिशय दुर्लभ मानला जातो. या दिवशी संपूर्ण दिवस भगवान शिव यांचे स्मरण करण्याला महत्त्व आहे. दुसऱ्या दिवशी रविवारी महाशिवरात्री आहे. या दोन्ही दिवशी शिव पूजा, अर्चना करायची आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी सूर्योदयाच्या आसपास ४५ मिनिटे शिव पूजन, स्तोत्र पठण करावे. त्यामुळे पुण्य फलप्राप्ती होते. सायंकाळी सूर्यास्ताच्या आसपास शुचिर्भूत होऊन भगवान शिव यांची अर्चना करायची आहे. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा दिवसभर जप



करावा. भगवान शिव यांना १०८ बिल्वपत्र अर्पण करावे. ही पूजा शक्यतो घरीच करावी. मात्र घरी पिंडी नसेल तर मंदिरात करावी. परदेशातील लोकांनी मानसपूजा करावी. जप तर करूच शकता. थोडक्यात सूर्यास्तसमयी भगवान शिव यांची अर्चना करणे महत्त्वाचे आहे. मनापासून आपण सर्वांनी जर शिव अर्चना केली तर ग्रहणाची तीव्रता एकदम कमी होईल. कोणालाही त्रास होणार नाही. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे पूजा झाल्यावर तिळाच्या तेलाचा दिवा रात्रभर तेवला पाहिजे अशा पद्धतीने लावावा. रविवारी सकाळपर्यंत तो राहील असे नियोजन करावे. त्याने सर्व अशुभ जळून जाते. शिऱ्याचा नैवेद्य श्रीपाद आणि भगवान शिव यांना दाखवावा. हे केल्याने त्यांची अखंड कृपा आपल्यावर राहील. संतान प्राप्ती, अनेक रोग, बॅडलक फेस करत असतील तर त्यांनी ही पूजा अवश्य करावी.

**ॐ नमः शिवाय, श्रीपाद राजम शरणं प्रपद्ये!**



# नागपूरचा बडकस चौक अन् सद्गुरू श्री गजानन महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शेगाव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज हे भक्तांच्या जीवनातील अडचणी दूर करणारे करुणासागर विभूतीमत्व होते. त्यांच्या कृपेचा, महिम्याचा आणि भक्तवत्सलतेचा अनुभव भाविकांनी वेळोवेळी घेतला आहे. १९०८ मध्ये अशाच एका अद्भूत आणि ऐतिहासिक घटनेचे नागपूर शहर साक्षीदार झाले. १९०८ मध्ये श्री गजानन महाराज नागपूर येथे सुमारे सहा महिन्यांच्या मुक्कामासाठी आले होते. या काळात ते सीताबर्डी येथील श्रीमंत गोपाळराव बुटी यांच्या वाड्यात वास्तव्यास होते. या मुक्कामादरम्यान त्यांनी नागपूरकर भक्तांना आपल्या अमृतमय उपदेशाने जीवनमार्ग दाखवला. महाराजांचे दर्शन, चरणस्पर्श आणि वचन यामुळे अनेकांच्या जीवनात श्रद्धा आणि आशेचा नवा किरण आला. नागपूरचा हा मुक्काम संपण्यापूर्वी, श्रीमंत रघुजी महाराज भोसले ( चतुर्थ ) आणि धर्मभूषण श्रीमंत राजे लक्ष्मणराव महाराज भोसले यांनी श्री गजानन महाराजांना महालच्या भोसले राजवाड्यात तसेच सक्करदरा राजवाड्यात आमंत्रित केले. तेथे महाराजांची पाद्यपूजा करून यथोचित सन्मान करण्यात आला.

**'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।**
गुरुर्साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥'

याच नागपूर मुक्कामात शहरातील एक प्रसंग पुढे जाऊन अत्यंत चमत्कारिक ठरला. सीताबर्डीवरून गजानन बाबांची स्वारी भालदारपुऱ्यात डॉ. लक्ष्मणराव परांजपे (पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांच्या अनुपस्थित कार्यवाहक सरसंघचालक राहीलेले) यांच्या वाड्यात आली. परांजपे कुटूंबियांनी श्रीमहाराजांची मनोभावे पूजा केली. पुढे सध्याच्या रुईकर रस्त्यावरून जातांना मध्ये एक चौक लागतो. आज हा चौक बडकस चौक किंवा पंडित बच्छराज व्यास चौक म्हणून ओळखला जातो. मात्र त्या काळी या चौकाला नागपूरी लोकभाषेत "निपुत्रिक चौक" असे संबोधले जात असे.
या चौकाच्या चारही बाजूंना असलेल्या घरांमध्ये अनेक वर्षांपासून वंशवृद्धी झाली नव्हती. त्यामुळे हा चौक "निपुत्रिक" म्हणून ओळखला जाऊ लागला होता.
अशा परिस्थितीत अवधूत, दिगंबर आणि अवलिया स्वरूपातील श्री गजानन महाराज चालता- चालता अचानक थांबले आणि बडकस वाड्याच्या ओट्यावर बसले. महाराजांचे दर्शन होताच बडकस कुटुंबीय भावविवश झाले. त्यांनी श्रद्धेने महाराजांची पाद्यपूजा केली.

अनंत कोटी ब्रह्मांडनायक, राजाधिराज, योगीराज असलेल्या श्री गजानन महाराजांनी ती पूजा स्वीकारून बडकस दांपत्याला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद दिला.

'श्रद्धावान् लभते ज्ञानं, तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥'

या घटनेचा परिणाम पाहता पाहता संपूर्ण चौकात पसरला. बडकस कुटुंबाच्या पाद्यपूजनाची वार्ता कळताच या चौकातील इतरही चार घराण्यांतील लोक महाराजांच्या दर्शनासाठी पुढे आले. कालांतराने, त्या सर्व घराण्यांमध्येही वंशाभिवृद्धी झाली आणि श्रीमहाराजांचे शब्द अक्षरशः खरे ठरले.
हा प्रसंग केवळ चमत्कार नव्हता, तर सद्गुरूकृपेचा साक्षात अनुभव होता. याच दिव्य घटनेमुळे 'निपुत्रिक चौक' म्हणून ओळखला जाणारा हा चौक पुढे 'बडकस चौक' म्हणून ओळखला जाऊ लागला. नागपूरच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासात हा प्रसंग आजही श्रद्धेने स्मरणात ठेवला जातो.

# शनी चालिसामुळे भीती नष्ट!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात शनी देवांना न्यायाची देवता मानले जाते. शनी देवाच्या प्रकोपापासून वाचण्यासाठी आणि त्यांची कृपा प्राप्त करण्यासाठी 'शनी चालिसा' पठण करणे अत्यंत फलदायी मानले जाते. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या पत्रिकेत साडेसाती किंवा ढैया सुरू असते तेव्हा शनी चालिसाचा पाठ केल्याने मानसिक शांती मिळते आणि जीवनातील अडचणी कमी होतात.

शनी चालिसाचे नियमित वाचन केल्याने भीती नष्ट होते आणि आत्मविश्वास वाढतो. जर आपणास शुद्ध मराठीत शनी चालिसा वाचायचे असेल किंवा संग्रही ठेवायचे असेल, तर शनी चालिसा मराठी पीडीएफ या वेबसाईटवरून सहज डाऊनलोड करू शकता. भक्तिभावाने शनी देवांची आराधना करा आणि आयुष्यातील अडथळे दूर करा.

शनी चालिसा ही भगवान शनी देव यांची स्तुती आणि प्रार्थना करणारी ४० श्लोकांची रचना आहे. शनी देव हे न्यायदेवता आणि कर्माचे फळ देणारे मानले जातात. या चालिसा पठणामुळे भक्तांना शनी देवाच्या साडेसाती, ढैय्या किंवा इतर अशुभ प्रभावापासून शांती आणि संरक्षण मिळते, असे मानले जाते. शनी देवाचे आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी, शारीरिक आणि मानसिक वेदना दूर करण्यासाठी तसेच सुख-समृद्धी आणि सद्बुद्धी मिळविण्यासाठी ही चालिसा अत्यंत प्रभावी मानली जाते. शनिवारच्या दिवशी ही चालिसा वाचणे विशेष फलदायी असते.



**॥ दोहा ॥**
जय गणेश गिरिजा सुवन,
मंगल करण कृपाल।
दीन दुःख दूर करा कीजय
नाथ निहाल ।
जय जय श्री शनिदेव प्रभू,
सुनाहु विनय महाराज।
करहू कृपा, हे रवि तनय,
राखू लोकांची लाज।

**॥ चौपट ॥**
जयती जयति शनिदेव दयाला ।
करित सदा भक्त प्रतिपाल
चारी बाहू, तनु श्याम विराजाई ।
कपाळ रतन मुकुट प्रतिमा
सर्वात सुंदर भाला।
विक्षिप्त दृष्टी,
कुंडल श्रवण उजळून निघाले।
हे मल मुक्तान मनी दमके
करात गदा त्रिशूळ।
क्षणभर अरिहीं सहारा
पिंगळ, कृष्ण, छाया, नंदन।
यम, कोनस्थ, रौद्र, साध भंजन।
सौरी, मंड, शनि, दशनामा।
भानु पुत्र पूजाहीं सब काम
जा पण परमेश्वर प्रसन्न आहे।
रंखून राव कां क्षण माही
डोंगर दिसतो.
त्रिनाहूला पर्वत करा।
राज मिल्लत वन रामहीं दीन्हो।
कैकेयहुन मरण हरि लिन्हो ।
बनहुन मध्ये हरिणाने कपट
दाखवले।
आईची जाणती हुशारी
लखनाहीं शक्ती विकल
करीदरा।
माचीगा पार्टीत आक्रोश
रावणाची गती मोजली गेली।
रामचंद्र पुत्राने द्वेष वाढवला।
दीयो पतंग करी कांचन लंका।
बाजी बजरंग बीर की डंका
नृपा विक्रमावर तुही पागु प्रवाह।
चित्रा मयूर निगली गेली हारा
हार नौलाखा लागयो चोरी।
हात पाय भीत तोरी

वाईट स्थिती दाखवा।
तेलीहीन घर क्रशर बनवा
विनय राग दीपक कोण आहे?
मग परमेश्वर प्रसन्न होतो।
हरिश्चंद्र नृपा स्त्री बिकिनी।
तू घुमट घर पाण्याने भरले।
तैसा नळावर दशा सिरानी ।
भुंजी-मिन पाण्यात उडी मारली
जेव्हां श्री शंकरीं गेला ।
पार्वती सती झाली।
जरा उशीरा करा।
नभ उडी गयो गौरीसुत आघाडी
तुझी अवस्था पांडवांवर आहे।
उरलेली द्रौपदी उधार घेतली
असती।
कौरवांनाही मारू नका।
युद्ध महाभारत करी दरियो
रवि म्हणे मुख म्हण धरी
तत्काळ।
त्याने वर खाली उडी मारली।
बाकी देव-लखी विनंती।
आपल्या तोंडात सूर्य चमकू द्या।

वाहन प्रभुचे सात सुजाण।
जग दिग्ज गर्दभ मृग स्वना ।
जम्बुक सिंग वगैरे नखे पट्टे।
म्हणून फळाला ज्योतिष
म्हणतात।
गजवाहन लक्ष्मी गृह आवण।
हे ते सुख संपती उपजावई।
गाढव हानी करई बहु काजा।
गर्दभ सिंधाकर राज समाज।
जंबुक बुद्धीचा नाश करा।
हरणाचा त्रास मारतो।
जेव्हा स्वान स्वार होतो।
भय भारी, चोरी इ।
हे चार चरणांचे नाव आहे।
सोने, लोखंड, चाव्या आणि
तांबे।
लोखंडी मंचावर जेव्हा परमेश्वर
येतो।
संपत्तीने लोकांच्या मालमत्तेचा
नाश केला पाहिजे।
समानता तांबे चांदी शुभेच्छा।
सुवर्ण सर्वशक्तिमान मंगल करी।
हे शनीचे पात्र नेहमी गात
असते।
सर्वात वाईट हरकत नाही।
अदभूत नाथ दिखावें लीला।
शत्रूचा मादक यज्ञ सैल होऊ
द्या।
जो पंडित सुयोग बुलावाई।
शनीला विधिवत शांतता प्राप्त
झाली।
लोक शनिवारी जल अर्पण
करतात।
दिवे दान करून अनेक सुख।
कहात राम सुंदर प्रभू दासा।
शनि सुमिरात सुखाचा प्रकाश
होतो।

**॥ दोहा ॥**
शनिश्चर देव यांना मजकूर
पाठवला की विमल तयार व्हा
करात धडे चाळीस दिवस, हो
सागर पार॥

# प्रदोष व्रतावेळी सायंकाळी महादेवांना भेटण्याची वेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कधी-कधी आयुष्यात सगळे असूनही मन अस्वस्थ असते. अशा वेळी जेव्हा सूर्य मावळतो आणि दिवस-रात्रीच्या सीमारेषेवर शांतता पसरते तेव्हाच एक दिव्य वेळ येते प्रदोष.
प्रदोष म्हणजे फक्त एक तिथी नाही. तो असा क्षण आहे, की जेथे मन थांबते, श्वास निवतो आणि महादेव अगदी जवळ येतो. त्रयोदशीच्या सायंकाळी, सूर्यास्तानंतरची ती काही क्षणांची वेळ. जिला शास्त्रांनी प्रदोषकाल म्हटले आहे. त्या वेळेत केलेली थोडीशी भक्ती पूर्ण दिवसांच्या तपस्येइतकी फलदायी ठरते.

### प्रदोष व्रत का करावे?
कारण हे व्रत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही मार्गांना स्पर्श करते.
- मनातील ओझे हलके होते.
- जीवनात अडलेली कामे मार्गी लागतात.
- घरात शांतता आणि समाधान नांदते.
- सर्वांत महत्त्वाचे मन शिवाशी जोडले जाते.

### प्रदोष व्रत कसे करायचे?
सकाळपासून उपवास किंवा हलका आहार. सायंकाळी स्नान करून स्वच्छ मनाने शिवपूजा. शिवलिंगावर पाणी, दूध अर्पण. बेलपत्र, दीप, धूप आणि शांतपणे "ॐ नमः शिवाय" जप. इतकेच पुरेसे आहे. भगवान महादेव विधीपेक्षा भावना पाहतात.

### आठवड्यानुसार प्रदोषाचे विशेष फल
- **सोमप्रदोष-** मनःशांती आणि पारमार्थिक समाधान
- **शनिप्रदोष-** संततीसुख व स्थैर्य
- **भौमप्रदोष-** कर्ज व अडचणींपासून मुक्ती
- **अर्कप्रदोष-** आरोग्य व दीर्घायुष्य
- **बुधप्रदोष-** पापक्षालन आणि अंतःशुद्धी

पुराणात सांगितले आहे, की चंद्रदेवांनीही जेव्हा दुःख आले तेव्हा महादेवांची उपासना केली आणि त्याच उपासनेतून सोमनाथ प्रकट झाले. प्रदोष व्रत म्हणजे काय, हे थोडक्यात सांगायचे तर दिवसातून थोडा वेळ स्वतःसाठी, मनासाठी आहे आणि महादेवांसाठी काढणे.

### आज नाही तर कधी?
या प्रदोषकाली दिवा लावा. शिवनाम घ्या आणि मनातील एकही गोष्ट न सांगता फक्त शांत बसून महादेवांकडे पाहा. ते ऐकतील नेहमीप्रमाणे. जे शब्दांत सांगता येत नाही, ते प्रदोषकाली महादेव ऐकून घेतात.
हर हर महादेव। ॐ नमः शिवाय..!

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)